पुढारी
E-PAPER

# राज्याला गुंतवणुकीसाठीचे सर्वोत्तम स्थान बनविण्याचे प्रयत्न : मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्योगाच्या वाढीस खीळ घालणारे नियम व कायद्यात बदल करण्यासह परवानगीची प्रक्रिया सुलभ व गतीमान करून राज्याला गुंतवणुकीसाठीचे सर्वोत्तम स्थान बनविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मुंबईला आपण शांघाय नव्हे तर मुंबईच बनवू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली. तिसऱ्या महाराष्ट्र इकॉनामिक समिटचे उद्‌घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

उद्योग सुरू करण्यासाठी सरकारकडून अनेक प्रकारच्या परवानग्या घ्याव्या लागतात. त्यामुळे औद्योगिक विकासाची गती कमी होते. हे लक्षात घेऊन सरकारने एक खिडकी योजनेला तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. तसेच प्रगतीला अडसर ठरणारे कायदे व नियम बदलण्याचेही नियोजन आहे, असेही त्यांनी सांगितले.